ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825 (UIF) VOLUME - 5 | ISSUE - 2 | OCTOBER - 2018

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# मराठ्यांच्या स्वातंत्र्य युध्दात संभाजी महाराजांची भूमिका

**प्रा. संतोष शंकरराव इंगोले**
**श्री तु.जा. कला व विज्ञान महाविद्यालय, वाशीम.**

## प्रस्तावना :



शिवाजी महाराजांच्या अकाली निधनाने मराठ्यांच्या इतिहासातील एक अभुतपुर्व पर्व संपले. या पर्वात शेकडो वर्षे गुलामगिरीत राहिलेल्या महाराष्ट्रातील समाजाला शिवाजी महाराजांनी स्वराज्य व स्वातंत्र्य निर्माण करुन दिले. दक्षिणेत लाचारीने जीवन जगणाऱ्या महाराष्ट्रात अस्मिता निर्माण करुन दक्षिणेत स्वराज्याच्या रुपाने सत्ता स्थापन केली. या स्वराज्याच्या रक्षणाची जबाबदारी शिवाजी महाराजांनतर संभाजीराजावर आली. राजगादी प्राप्त होताच मोघल बादशहाशी लढण्याचा प्रसंग संभाजी राजावर आला. संभाजी राजांना पित्याच्या मृत्युनंतर राजगादी मिळावयास हवी असतांना त्यापासुन त्यांना दुर ठेवण्याचा प्रयत्न दरबारातील काही मंत्र्यांनी केला. परंतु आपल्या बुध्दीचातुर्याने व सेपानती हंबीरराव मोहीते यांच्या सहकार्याने त्यांनी यशस्वीपणे सत्ता हस्तगत केली. अंतर्गत विरोध आणि औरंगजेबसारखा प्रबळ शत्रु सीमेवर असतांना परिस्थितीने कोणताही शासक नामशेष झाला असता पण मराठ्यांच्या या शुर राजाने अंतर्गत शत्रुचा बंदोबस्त तर केलाच शिवाय ९ वर्षे सत्त शत्रुशी संघर्ष केला आणि आपले साम्राज्य टिकवून ठेवले. परंतु दुर्देवाने छत्रपती संभाजी राजे शत्रुच्या हाती सापडले आणि अत्यंत अमानवीय पध्दतीने विटंबना करुन त्यांना ठार मारण्यात आले. संभाजी महाराजांच्या मृत्युने मराठ्यांचे स्वातंत्र्ययुध्दाचे एक पर्व जरी संपले तरी संभाजी महाराजांच्या जिवंत असतांनी मराठ्यांनी जी कामगीरी करुन दाखविली नाही ती त्यांच्या मृत्युनंतर पेटून उठलेल्या मराठ्यांनी करुन दाखविली.

## संभाजी राजांचे बालपण व राज्यारोहण -

१४ मे १६५७ रोजी छत्रपती संभाजी महाराजांचा जन्म. राणी सईबाईच्या पोटी पुरंदरच्या किल्यावर झाला. संभाजी राजे दोन वर्षाचे असतांनाच त्यांच्यावरील मातृछत्र हरविले. तेव्हापासुन ते आजी जिजाबाईच्या छत्रछायेत वाढले. आईवीना पोर यामुळे संभाजीराजांचे पालनपोषण चांगले झाले. तसेच त्यांचे युवराज म्हणून महत्व वाढु लागले. पुरंदरच्या तहानंतर त्यांना आग्रा येथे बादशहाच्या दरबारामध्ये जाण्याची संधी मिळाली. या भेटीत त्यांना दिल्लीच्या राजकारणाची कल्पना आली परंतु आग्रा भेट संभाजी महाराजांच्या जीवनातील मोठे संकट होते. वयाच्या १४ व्या वर्षापासून शिवाजी राजांनी त्यांना रायगडावर राज्याचा काही कारभार सोपविला. ॲबे कॅरे हा फ्रेंच प्रवासी संभाजी राजाविषयी लिहीतो, 'हा युवराज लहान असला तरी आपल्या पित्याच्या किर्तीस साजेल असाच शुर आहे. आपल्या पित्याप्रमाणेच तो युध्दकलेत तरबेज असुन चांगल्य वयोवृध्द सेनापतीचीही बरोबरी करेल इतका तो तयार आहे. तो मजबुत बांध्याचा असुन रुपवान आहे.'

शिवाजी महाराजांच्या मृत्युनंतर राजपद संभाजी राजांना मिळावयास पाहीजे होते. परंतु ते त्यांना न मिळु देता धाकटा युवराज राजाराम महाराज यांना ते द्यावे अशी मसलत राजगडावर चालु होती. शेवटी राजाराम महाराजांचे मंचकारोहण करण्यात आले आणि पन्हाळयावर आक्रमण करुन संभाजी राजांना कैद करण्याची तयारी सुरु झाली. शिवाजी महाराजांच्या मृत्युची बातमी पन्हाळयावर संभाजी राजांना कळताच सर्व किल्लेदारांना पन्हाळयावर रुजु होण्याच्या आज्ञा पाठविण्यात आल्या. सेनापती हंबीरराव मोहीते यांना संभाजी राजांची बाजु न्याय वाटत होती. म्हणून त्यांनी अण्णाजी दत्तो, मोरोपंत पिंगळे यांना कैद करुन महाराजांच्या समोर उभे केले. हंबीरराव मोहीतेच्या सहकार्याने संभाजी राजांनी रायगडावर आक्रमण केले. फारसा प्रतिकार न होता रायगड संभाजी राज्याच्या ताब्यात आला. राज्यात स्थिरस्थावर होताच १६ जानेवारी १६८१ रोजी संभाजी महाराजांचा राज्याभिषेक सोहळा पार पडला. पुढे विरोधकांना सेवेतुन काढून टाकण्यात आले आणि विश्वासू व एकनिष्ठ सेवकांना मोठ्या पदावर नियुक्त करण्यात आले.

## संभाजी महाराज व मोघल-मराठा संघर्ष -

शिवाजी महाराजांच्या मृत्युच्या वेळी मोघलांशी संघर्ष सुरु होता. उत्तर भारतात मोघलांचा राजपुतांशी संघर्ष सुरु असल्यामुळे दक्षिण भारताच्या सुभेदारीवर बहाद्दुरखानची नेमणूक केली होती. बहादुरखानने दक्षिणेत आल्यावर खान्देश व बागलानमध्ये मराठ्यांनी विजयी केलला प्रदेश जिंकण्याला सुरुवात केली. त्याने अहिवंतगडास वेढा दिला. ऑक्टोंबर १६८० मध्ये मराठ्यांच्या फौजा खानदेश व औरंगाबादकडे गेल्या. खानदेशाकडे गेलेल्या फौजेने अचानक ब-हाणपुरचा मार्ग धरला. हंबीरराव मोहीते यांच्या नेतृत्वात हे शहर मराठ्यांनी तिन दिवस लुटले व लक्षावधी रुपयाची लुट निर्माण केली. ही बातमी बहादुरखानास कळताच तो अहिवंतगडाचा वेढा सोडून ब-हानपुरच्या बचावासाठी आला. परंतु तोपर्यंत मराठ्यांनी ग्वाल्हेरचा किल्ला गाठला होता.

मराठ्यांची दुसरी तुकडी औरंगाबादच्या परिसरामध्ये लुट करीत होती. तीला हंबीरराव मोहीतेची फौज येवून मिळाली. या फौजेने औरंगाबादच्या परिसरात लुटालुट केली. भिमसेन सक्सेना औरंगाबादच्या स्थितीविषयी लिहीतो, `मी दुपारी औरंगाबादमध्ये दाखल झालो तेव्हा सर्व घरांचे दर बंद होते. बाजारातुन व गल्लीतुन एकही मनुष्य दिसत नव्हता.' अशी वचक मराठ्यांच्या फौजांनी मोघली प्रदेशात निर्माण केली होती.

औरंगजेबाने राजपुत राज्य गिळंकृत करण्याला सुरुवात केली. तेव्हा राजपुतांचे राज्य जिंकणे कठीण आहे ही बाब राजपुत्र अकबराच्या लक्षात आली. व त्याने औरंगजेबाला राजपुतांशी समोपचाराचे धोरण अवलंबवावे असे सांगीतले तेव्हा औरंगजेबाने अकबराची निर्भत्सना केली. त्यामुळे अकबराने चिडून स्वतःला मोघल बादशहा घोषित केले. व राजपुत्र शासक दुर्गादास राठेडची मदत घेतली. औरंगजेबासमोर टिकाव न लागल्याने त्यांनी दक्षिण भारतात संभाजी राजांच्या आश्रयास आले. या गोष्टीचे गांभीर्य औरंगजेबाच्या लक्षात आल्याने तो स्वतः अकबर व मराठे यांना नेस्तनाबुत करण्यासाठी दक्षिण भारतात आला. तेव्हापासुन तर त्याच्या मृत्युपर्यतच्या कालखंडात तो दक्षिणेत मराठ्यांचे साम्राज्य नष्ट करण्यासाठी लढत राहीला. परंतु त्याला शेवटी मृत्युला सामोरे जावे लागले. या कालखंडालाच `मराठ्यांचे स्वतंत्र युध्द' असे म्हणतात.

संभाजी महाराजांचे जिवन संकटांनी भरले होते. सुरुवातीला राजगादी प्राप्त करण्यासाठी झालेला विरोध शमतो नाही तोच पन्हाळा गडावर त्यांच्यावर विषप्रयोग करण्यात आला. यामधुन महाराज सुखरुप राहीले. तोच कटवाल्यांनी अकबराच्या मदतीने त्यांना पदच्युत करण्याचा प्रयत्न केला तोही फसला. कटाची माहीती संभाजी महाराजांना मिळताच एका राजाने ज्याप्रकारे वर्तन करावे तसे वर्तन संभाजीराजांनी केले.

औरंगजेब बादशहा दक्षिणेत स्वराज्यावर फौजा घेवून आला त्यावेळी शत्रुंच्या फौजांचा सामना करण्याची पुर्ण तयारी संभाजी राजांनी केली. फौज उभारणे, किल्यात रसद पुरविणे, शत्रुंच्या हालचालीवर लक्ष ठेवणे याबाबतीत कसुर केली जात नव्हती. तसेच अकबराला दिल्लीच्या गादीवर बसविण्याचे नियोजन महाराजांचे सुरु होते. दरम्यान सिद्दीच्या दंडराजापुरीस महाराज व अकबर यांनी वेढा दिला. परंतु उत्तर कोकणात हसनअलीखान आपल्या पस्तीस हजार फौजेनीशी उतरल्यामुळे मराठ्यांना दंडाराजापुरी मोहीम दादाजी रघुनाथवर सोपवुन उत्तर कोकणात जावे लागले. हसनखानाने उत्तर कोकणातील कल्याण भिवंडी १६८२ मध्ये जिंकुन घेतली. मराठ्यांच्या फौजा स्वराज्यात व स्वराज्याच्या बाहेर शक्य त्या प्रमाणात नाशिक, बागलान, औरंगाबाद, अहमदनगर भागात मोगलांच्या प्रदेशावर आक्रमण करीत होत्या.

रामसेजचा किल्ला मराठ्यांच्या ताब्यात होता. हा किल्ला घेण्यासाठी औरंगजेबाने शहाबुद्दीन नावाच्या सरदारास पाठविले. परंतु किल्ल्यातील मराठा सरदार रुपाजी भोसले व नानाजी मोरे यांनी मोठा संघर्ष घेवून शहाबुद्दीनचा पराभव केला. त्यामुळे बादशहाने बहादुरखानास रामसेनवर पाठविले परंतु त्याचाही मराठ्यांनी पराभव केला. केला तेव्हा औरंगजेबाने कासीमखान किरमानी याला किल्ला जिंकण्यासाठी पाठविले. परंतु त्यालाही किल्ला घेता आला नाही. संभाजी राजांनी किल्यावरील सरदाराचा बक्षीस देवून मानसन्मान केला.

हसनअलीखानाने जिंकलेली कल्याण-भिवंडी ही ठिकाणे जास्त काळ ताब्यात ठेवू शकले नाही. त्यामुळे कल्याण-भिवंडी विजयासाठी औरंगजेबाने रणमस्तखानाला उत्तर कोकणात पाठविले. परंतु त्याचा रुपाजी भोसले व निळो मोरेश्वर यांनी पराभव केला. त्यामुळे औरंगजेबाने रहुल्लाखानाला रणमस्तखानाच्या मदतीला पाठविले. परंतु शहजादा आजमशहा कोल्हापुर प्रदेशात विजयासाठी आलेला होता. त्याच्यावर हंबीरराव मोहीतेंनी हल्ला केला. या पराभवाने आझमशहाला कोल्हापुर प्रदेश सोडावा लागला.

दक्षिणेत येवून दोन तीन वर्ष झाली तरी बादशहाला मराठ्यांचे राज्य नष्ट करता आले नव्हते. त्यासाठी त्यने मराठ्यांच्या राज्यावर मोठ्या मोहीमेचे नियोजन केलेल्यानुसार शहजादा आजम व शहजादा बेदारबख्त यांना नाशिक भागात पाठविले. सरबलदखान बहादुरगडाकडे, रहुल्लाखानास नीरा नदीच्या प्रदेशात, बहरामंदखानास आष्टीच्या प्रदेशात व शहजादा मुअज्जम दक्षिण कोकणात व शहाबुद्दीनला मध्य कोकणात पाठविण्यात आले. मुअज्जम पंचेचाळीस हजार फौजेनिशी उत्तर कोकणात रामघाटातून उतरला. मार्गात मराठ्यज्ञांनी त्यांच्यावर अनेक वेळा हल्ले केले. त्यांच्या रसदी लुटल्या. मुअज्जमचा बंदोबस्त करण्यासाठी संभाजी राजांनी गोव्याचा वेढा सोडला. परंतु संभाजी राजांना रायगडावर यावे लागले. या स्वारीत मुअज्जमने मालवण, वेंगुर्ले, कुडाळ ही ठाणे लुटली. याशिवाय मराठ्यांचे कोणतेच नुकसान करता आले नाही. शेवटी अयशस्वी मुअज्जम औरंगजेबाजवळ येवून पोहोचला.

पुढे बादशहाने मामुरखानास शिवाजी महारजांची मुळ जहांगिरी पुणे, सुपे, इंदापुर जिंकण्यासाठी पाठविले. मामुरखानाने या प्रदेशात आपल्या सैन्याच्या छावण्या उभारल्या. शहाबुद्दीनने मध्य कोकणात उतरुन रायगडास वेढा देण्याचा प्रयत्न केला. पुढे शहाबुद्दीन रागडाच्या पायथ्यापाशी येवून वाडीचा प्रदेश जाळला परंतु त्याचा कवी कलेशाने मोठ पराभव केला. दरम्यानच्या काळात औरंगजेबाने आदिलशाही व कुतुबशाही विजीत केली.

याचवेळी कर्नाटकातील जहांगिरी सांभाळण्यासाठी संभाजी राजांनी आपले मेहुणे हरजीराजे महाडिक यांना सुभेदार म्हणून पाठविले. मोघलांनी विजापुर व गोवळकोंडा विजीत केल्यावर कर्नाटकामध्ये स्वाऱ्या केल्या. या मोघली सैन्याचा प्रतिकार तेथील मराठा शाशकांनी केला.

औरंगजेबाने विजापुर जिंकल्यावर तेथे आपला मुक्काम केला व तेथुनच पुढील मोहीमांचे संयोजन करत होता. यावेळी मातबरखान, आज्जम, मुकर्ररखान यांनी स्वराज्यात धुमाकुळ घातला. व मराठ्यांचे किल्ले विजीत करण्यास सुरुवात केली. यावेळी संभाजी महाराजांविरुध्द शिर्केनी बंडाळी केली. त्यामुळे शिर्केचा बंदोबस्त करण्यासाठी संभाजी रायगडावरुन कवीकलशला येवून मिळाले. व दोघांनी शिर्केचा पराभव केला. यावेळी संभाजी महाराज खेळणा किल्ल्यावर होते. १६८९ च्या सुमारास ते खेळण्यावरुन रायगडाकडे निघाले. वाटेत संगमेश्वर येथे त्यांचा बरेच दिवस मुक्काम पडला. यावेळी मोघलांचा सरदार शेख निजाम कोल्हापुर भागात आपली छावणी करुन होता. संभाजी महाराजांच्या मुक्कामाची बातमी कळताच तो तीन हजार फौजेनिशी संगमेश्वरला चालुन आला. झालेल्या संघर्षात मराठ्यांकडील अनेक सरदार मारले गेले. व संभाजी महाज व कवी कलश यांना कैद करुन बहाद्दुरगड येथे औरंगजेबासमोर उभे करण्यात आले. शेवटी संभाजी महाराजांना ११ मार्च १६८९ रोजी ठार करण्यात आले. याविषयी ईश्वरदास नागर लिहीतो, `संभाजीचे डोळे काढण्यात आले. संभाजी गविष्ट होता. त्याने जेवण सोडले. ही बातमी बादशहाला कळाली. शेवटी संभाजीला अतिशय हालअपेष्ठा देवून त्याच्या शरीराचे तुकडे तुकडे करुन ठार केले.'

## सारांश -

संभाजी महाराज मराठ्यांच्या इतिहासातील अतिशय दुर्देवी व्यक्तीरेखा म्हणून सुरुवातीला काही इतिहासकारांनी मांडले होते. तर काहींनी त्यांना व्याभिचारी व अविवेकी सुध्दा सिध्द करण्याचा प्रयत्न केला. परंतु संभाजी राजे मराठ्यांच्या इतिहासातील अतिशय प्रभावशाली व प्रेरणादायी व्यक्तीमत्व आहे. संभाजी महाराजांनी विशाल मोघली साम्राज्यांशी सतत ८-९ वर्षे लढा दिला. साधन सामुग्रीची कमी, स्वकीयांचा विरोध याही कठीण स्थीतीमध्ये मराठा राज्य टिकविण्यासाठी आपल्या प्राणाचीही पर्वा न करता संभाजी राजा श्रेष्ठ आहे. संभाजी महाराजांची सर्वात मोठी कामगीरी म्हणजे स्वराज्य रक्षण, स्वधर्म, स्वसंस्कृती रक्षण होय.

मोघल, पोर्तुगीज, सिध्दी, मराठी वतनदार अशा अनेक शत्रुंशी संभाजी राजांनी सतत लढा देवून स्वराज्याचे रक्षण केले. तसेच अंतर्गत शत्रुंना राजगादीपासुन दुर ठेवण्याचा प्रयत्न केला. एवढेच नव्हे तर पन्हाळ्यावर विषप्रयोग करुन, ठार मारण्याचा प्रयत्नही झाला. या सर्व संकटांना सामोरे जावून स्वराज्याच्या कारभाराची घडी संभाजी राजांनी बसविली. छत्रपती शिवाजी महाराज जिवन असेपर्यत मोघल बादशहा औरंगजेब दक्षिण भारतात आलेला नव्हता. परंतु संभाजी राजे सत्तेच येताच औरंगजेब मराठ्यांचे स्वराज्य नष्ट करण्यासाठी दक्षिणेत आला. औरंगजेबाच्या विशाल शक्तीसमोर संभाजी राजांनी उपलब्ध साधन सामुग्रीच्या सहाय्याने मोघलांच्या फौजेसमोर संघर्ष घेतला. परंतु दुर्देवाने संभाजी राजा मुकरर्बखान याच्या कैदेत पडले. आणि स्वराज्य मावळते की काय अशी स्थिती निर्माण झाली. परंतु संभाजी महाराजांचा कर्तृत्व, स्वधर्म आस्था, करारीपणा यामुळे त्याच्या मृत्युनंतर महाराष्ट्र मोघलाविरुध्द पेटुन उठला.

## संदर्भ -


१) छत्रपती शिवाजी - प्रभाकर माचवे
२) मराठ्यांचा इतिहास - जयसिंगराव पवार
३) दक्षिण के देशरत्न - राजेंद्रसिंह चव्हाण
४) छत्रपती संभाजी - कमल गोखले
५) राईज ऑफ द मराठा पॉवर - म.गो. रानडे
६) उग्र प्रकृती संभाजी - सरदेसाई
७) मोघल आणि मराठे - सेतु माधवराव पगडी
८) मराठ्यांचा इतिहास - अ.रा. कुळकर्णी
९) मराठा प्रभुत्व - बी.एन. लुनिया